२६२

# फॅशनचा पोवाडा

(चाल:—कौन्सिली जाना हराम०)

पुरे पुरे ही विलायती फॅशन गोंधळ लइ घाली।
मर्दा र गोंधळ लई घाली ॥
छोट्या मोठ्या समद्या लोकांची दिशाभूल झाली ॥धृ॥
आजकालची फॅशन कवटाळिण बुडवित सकलाला।
तिच्या कैफान किती जणांचा बोजवारा उडाला ॥१॥
जो उठला तो शहरामधीं घुसूं लागे मर्दा।
खेडींपाडीं समदी उठलीं ठार झाला धंदा ॥२॥
गल्लोगल्लीं दिसती होटलं चहा, भजी, पाव।
सिंगल, डबल, तैसा सोडा, गरम वडा, शाव ॥३॥
न्हाव्यांनी ती शाप उघडलीं लई ऐटदार।
कटिंग करण्या जाती तेथ बनुनि सरदार ॥ ४ ॥
बायकावानी नटणं ठकणं, बोलणं, चालणं, वागणं।
शक्ति नाहीं मनगटीं-र-मर्दा थू: तुमचं जीणं ॥ ५ ॥
किरकीटानं येड लाविलं समद्या पोरांना।
मिशाळ पोरहि त्यामधिं घुसले दाविती तोऱ्याला ॥६॥
डोईवरचा भांग दिसेना ठार केलं टोपीला।
अचरट बनुनि फिरतो रस्त्याला लाज न वाटे मर्दाला ॥७॥
पट्टी खाउनशान सिगार धरतो आपल्या उजव्या हाताला।
वेडवाकड केस फिरवुनशान पावडर लावतो थोंडाला ॥८॥
क्लपामंधी घुसुनशान ते लई करत्याती चाळा।
परकार काय मी सांगु तेथला किळसवाणा तो घोटाळा ॥९॥
बाहेर येऊनशान देती याखान पोपटा र वानी।
सवता कोरड राहुनशानी ते व्हती बरम ग्यानी ॥ १० ॥

आपआपसांत भांडण भांडता आक्षी बोक्यावानी ।
परका येऊनशान बसला छातिवर नाहि त्येची ग्यानी ॥ ११ ॥
फंडावाचुनि पाय उचलेना बेटे भाग्यशाली ।
काय करावं अस्ल्या लोकांना बुवाबाजी सम्दी ॥ १२ ॥
जातीमंदी तंटे बखेडे स्वार्थाला भुलला ।
आपलाच माणूस तेव्हडा शहाणा बाकी मुर्ख ठरला ॥ १३ ॥
असला कुजका नासका मेंदू तिथेंच ठेचावा ।
स्वदेशाचा विसरच पडला मानि न कोणाला ॥ १४ ॥
वेस तितक सोडूनशान तें वंगाळ घेति शिक्षान ।
नवमतवादी म्हणवुनि घेती फॅशनचा हा परिणाम ॥ १५ ॥
देशि विदेशि कांहिं न समजे फॅशनचा ही पाहिजे अपटु–डेट ।
एकहि घर तें सुनें दिसेना फॅशनवांचुन गांवांत ॥ १६ ॥
जखीण फॅशन सोडा सारी जपा जपा हो देशाला ।
प्रल्हादराय विनवितो सर्वांना हिंदु हा जोडावा ॥ १७ ॥
रामदास अणि शिवबा तो या सांगुन गेला तत्वाला ।
ध्येय धरूनशान लागा कामीं करा आपली संघटना ॥ १८ ॥